सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ६ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा - सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नवीदिल्ली -** गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिका



ंच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असं निरिक्षण नोंदवलंय की स्थानिक संस्था अनिश्चित काळासाठी अडखळत ठेवता येणार नाहीत आणि वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथं मुदत संपली आहे किंवा प्रशासन राज असलेल्या महानगरपालिका, परिषदा, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घेण्यात याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

## युद्धाचं सावट गडद? केंद्राचे सर्व राज्यांना मॉक ड्रीलचे आदेश; तणाव वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढंच नाही तर पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात



तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल झाल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. यातच आता केंद्रीय गृहमंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना महत्वाचे निर्देश दिले आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सध्या दोन्ही देशात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार या संदर्भात अनेक महत्वाच्या बैठका घेत आहे. त्यामुळे दिल्लीत हालचाली वाढल्याचं दिसून येत आहे. रविवारी भारताच्या हवाई दल प्रमुखांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताच्या नौदल प्रमुखांनी देखील भेट घेत पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात चर्चा केल्याचं सांगितलं जातं.

## पालिका निवडणुकांचे निर्देश निघताच फडणवीस लागले कामाला

### सांगितला युतीचा फॉर्मुला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अहिल्यानगर**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुका लवकर घेण्यास सांगण्यात आले आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रितच लढेल अशी घोषणाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.




अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह राज्य सरकारमधील मंत्री, राज्यमंत्री उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी बैठकीतील निर्णयांची माहिती दिली. यावेळी पत्रकारांनी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत दिलेल्या निकालावर विचारले. यावर फडणवीस म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुत एकत्रित असेल. स्थानिक पातळीवर एखाद्या ठिकाणी वेगळा निर्णय होऊ शकतो पण एकूणच या निवडणुकीत महायुती एकत्रित लढणार आहे.

ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ च्या आधीची जी परिस्थिती होती ती परिस्थिती कायम ठेवावी. याचिकाकर्त्यांनी म्हटले होते की २०२२ मध्ये अहवाल आला त्यामध्ये ओबीसींच्या जागा कमी करण्यात आल्या. त्यामुळे न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे ओबीसींच्या घटलेल्या जागा देखील पुन्हा बहाल होणार आहेत असा याचा अर्थ होतो.

अहिल्यादेवी होळकरांच्या जीवनावर चित्रपट काढला जाणार आहे. अहिल्यानगरसाठी मेडिकल कॉलेज देण्यात येणार आहे. चौंडीचा तिर्थस्थळ म्हणून विकास केला जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. आज चौंडी येथे मंत्रिमंडळ बैठक झाली. चोंडी येथे ६८१ कोटींचा आराखड्याला मान्यता दिली आहे. अखिल भारतीय तीर्थस्थळ म्हणून त्यांना विकसित करण्यात येणार आहे. तुळजाभवानी मंदिर १८६२ कोटी, त्र्यंबकेश्वर२२१ कोटी, महालक्ष्मी मंदिर १४४५, माहूरगड ८२९ कोटी रुपये असे एकूण ५५३० कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय हॉस्पिटल, असं नाव या मेडिकल कॉलेजला देण्यात येणार आहे. यासोबत अहिल्यानगरमध्ये खास मुलींकरिता स्वतंत्र आयटीआय देखील तयार करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. महिला सक्षमीकरणाकरिता आदिशक्ती अभियान राबविण्याचं ठरवलं आहे. या अभियानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जागृती केली जाणार असल्याचं देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.

## संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीतून पाकिस्तान रिकाम्या हातीच माघारी

### पहलगाम हल्ल्यावरून सदस्यांनी घेतलं फैलावर!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ न्यूयॉर्क-** पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा भारतासह जगभरातल्या देशांनी निषेध केला. अनेक देशांनी दहशतवादविरोधी लढ्यात सोबत असल्याचं आश्वासन भारताला दिलं. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या विरोधी वातावरण तयार होत असल्याचं पाहून पाकिस्तानने थेट संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेकडे अर्थात मध्ये धाव घेतली. या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलावण्याची विनंतीही केली. पाकिस्तानच्या विनंतीवर बैठक भरली खरी, पण यात पाकिस्तानलाच सुनावण्यात आलं.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारनं सिंदू जल करार रद्द केला. त्यामुळे पाकिस्तानचा जळफळाट झाला. शिवाय अटारी सीमा बंद करण्याबरोबरच भारतातील पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले. त्यात हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर सीमेपलीकडून शस्त्रसंधीचं अनेकदा उल्लंघनही करण्यात आलं. शेवटी पाकिस्ताननं संयुक्त राष्ट्रात धाव घेतली. मात्र, तिथेही त्यांच्या पदरी निराशाच आली आहे.

संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेची बैठक सदस्य राष्ट्रांनी विनंती केल्यास बोलावता येते. त्याप्रमाणे ती बोलावलीही गेली. पण या बैठकीत काय चर्चा झाली, याचा तपशील मात्र जाहीर केला जात नाही. न्यूयॉर्कमधील सूत्रांच्या



हवाल्याने एएनआयनं दिलेल्या वृत्तानुसार या बैठकीत सर्व सदस्यांनी पाकिस्तानला पहलगाम हल्ला व त्यानंतरची आततायीपणाची पावलं यावरून सुनावलं आहे.

णछडउ मध्ये ५ पूर्णवेळ सदस्य व १० अस्थायी सदस्य असे एकूण १५ सदस्य असतात. पाकिस्तान यावेळी अस्थायी सदस्य आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी सकाळी झालेल्या या बैठकीत पाकिस्तानला पहलगाम हल्ल्यासंदर्भात कठोर प्रश्न विचारण्यात आले. पाकिस्तानकडून भारताला दोष देण्याचे अपयशी प्रयत्न बैठकीत इतर सदस्यांवर पुरेसा प्रभाव पाडू शकले नाहीत.

## भारताची विमानं पाकिस्तान सीमेतून बंद, दररोज बसतो अडीच कोटींचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नवी दिल्ली-** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध प्रचंड ताणले गेले आहेत. अतिरेक्यांनी पर्यटकांना धर्म विचारुन त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. यानंतर भारत सरकारने पाकिस्तान विरुद्ध कठोर निर्णय घेतले. पाकिस्तानी विमानांसाठी हवाई हद्द बंद केली. पाकिस्ताननेही भारताची कॉपी केली. भारतीय विमानांसाठी हवाई हद्द बंद केली. पाकिस्तानी राज्यकर्ते या निर्णयाला मास्टरस्ट्रोक मानत होते. परंतु, हाती आलेल्या ताज्या माहितीनुसार हा निर्णय कंगाल पाकिस्तानची तिजोरी आणखी रिकामा करणारा ठरला आहे.

खरंतर २४ एप्रिलच्या आधीपर्यंत पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून दररोज १०० ते १५० भारतीय विमान ये जा करत होती. या मोबदल्यात पाकिस्तानला दररोज ८७ हजार ५०० अमेरिकी डॉलर (२.४५ कोटी पाकिस्तानी



रुपये) मिळत होते. परंतु, पाकिस्तानने स्वतःच उत्पन्न मिळण्याचा मार्ग बंद केला.

पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी आपली हवाई हद्द बंद केल्यापासून आतापर्यंत पाकिस्तानला जवळपास १७.२० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. भारतीय विमानांना मार्ग बदलल्याने पाकिस्तानचा एअर स्पेस रिकामा झाला आहे. दुसरीकडे पाकिस्तानी निर्बंधांचा विचार न करता भारताने दोन नवीन मार्ग सुरू केले आहेत. रस्ता बदलल्याने भारतीय विमान कंपन्यांच्या खर्चात थोडी वाढही झाली आहे.पाकिस्तानची हवाई हद्द बंद झाल्याने भारतीय विमानांना अन्य पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. यामुळे विमान कंपन्यांच्या खर्चात थोडी वाढ झाली आहे. परंतु, हा खर्च सहन करण्याची विमान कंपन्यांची क्षमता आहे. पण पाकिस्तानची मात्र तशी क्षमता नक्कीच नाही. भारतीय विमानांचे ये जा थांबल्याने पाकिस्तानला रोज कोट्यावधींच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागत आहे. हा तोटा कसा भरून काढायचा असा प्रश्न पाकिस्तानसमोर आहे.

## दहशतवाद विरोधातील लढाईत आम्ही संसाधने पुरवू, अमेरिकेकडून भारताला मदतीचा हात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नवी दिल्ली-** भारताने दहशतवादाविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली असून या लढाईला अमेरिकेनेही पाठिंबा दर्शवला आहे. या लढाईसाठी अमेरिकेने सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रयत्नांना मदत करण्यासाठी आवश्यक ती संसाधने पुरवली जातील, असंही अमेरिकेने म्हटलंय. अमेरिकेचे प्रतिनिधी सभागृहाचे अध्यक्ष माइक जॉन्सन यांनी मंगळवारी भारताला असे आश्वासन दिले.

भारताला दहशतवादाविरुद्ध उभे राहावे लागेल. आम्ही त्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करू.

ट्रम्प प्रशासन दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी भारताला ऊर्जा आणि संसाधनांसह मदत करेल, असं जॉन्सन यांनी ठामपणे सांगितले. भारतासोबतचे संबंध अमेरिकेसाठी महत्त्वाचे आहेत यावर भर देऊन ते म्हणाले, आम्ही अमेरिकेत त्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शक्य तितके सर्व काही करू आणि मला वाटते की हे सर्व या संबंधाचा एक भाग आहे कारण ते



विकसित होत आहे. ट्रम्प प्रशासनाला त्या संबंधाचे महत्त्व स्पष्टपणे समजते आणि दहशतवादाच्या धोक्याचे महत्त्व स्पष्टपणे समजते.

हल्ल्यानंतर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी संवाद साधला होता. परराष्ट्र विभागाने म्हटले होते की वॉशिंग्टन भारत आणि पाकिस्तान दोघांच्याही संपर्कात आहे आणि त्यांनी देशांना उपायात्मक गोष्टींचा पाठपुरावा करण्याचे आवाहन केले होते. रुबियो यांनी भारताच्या अतिरेकी विरोधातील लढाईत पाठिंबा दर्शविला आणि पाकिस्तानला चौकशीत सहकार्य करण्याचे आवाहन केले. या आठवड्याच्या सुरुवातीला अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स म्हणाले होते की ट्रम्प प्रशासनाला आशा आहे की पाकिस्तान पाकिस्तानस्थित दहशतवाद्यांना शोधण्यासाठी भारताला सहकार्य करेल. आम्हाला आशा आहे की भारत या दहशतवादी हल्ल्याला अशा प्रकारे प्रतिसाद देईल की ज्यामुळे व्यापक प्रादेशिक संघर्ष निर्माण होणार नाही, व्हान्स यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

संपादकीय ......

# पाकिस्तानची कोंडी

जम्मू-काश्मीर विधानसभेच्या विशेष अधिवेशनात पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याविरोधात प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास पाठिंबा देताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला भावुक झाले. त्यांनी या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव घेतले आणि मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत, असे भावपूर्ण उद्गारही काढले. मार्चमध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकव्याप्त काश्मीर (पीओके)बाबत एक महत्त्वाचे वक्तव्य केले होते. पीओकेला भारतात विलीन केले की, काश्मीरबाबतचे सर्व प्रश्न संपुष्टात येतील, असे मत त्यांनी सडेतोडपणे व्यक्त केले होते. त्यावर कारगिल युद्ध झाले, तेव्हाच पीओके ताब्यात घेण्याची चांगली संधी भारताकडे आली होती.

आजही केंद्र सरकारने पाकव्याप्त काश्मीर जरूर ताब्यात घ्यावे, अशी स्पष्टोक्ती ओमर यांनी केली आहे. भारताकडून हल्ला होण्याची शक्यता असल्यामुळे संपूर्ण पाकिस्तानमध्ये घबराट निर्माण झाली असून, पीओकेमध्ये आपत्तीकालसदृश वातावरण आहे. भारताने पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी त्यांची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचा हा दृश्य परिणाम. राजनैतिक पातळीवर कठोर पावले उचलत भारताने चिनाब नदीवरील बगलिहार धरणातून पाकिस्तानकडे जाणारा पाण्याचा प्रवाह रोखला. इतकेच नाही तर तुमच्या लायकीप्रमाणे चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला ठणकावले.

तत्पूर्वी आर्थिक कोंडी करत आयात-निर्यात बंद केली. राष्ट्रीय सुरक्षेसाठी पाकिस्तानी जहाजांना भारतीय हद्दीत येण्यास मज्जाव करण्यात आला. परिस्थिती आणखी बिकट झाल्यास अधिकृतपणे आणीबाणी जारी केली जाऊ शकते, असे संकेत पीओकेचे पंतप्रधान अन्वर उल हक यांनी दिले आहेत. तेथे पर्यटकांना येण्यास बंदी घातली असून एक हजारहून अधिक मदरसे रिकामे केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पायदळ, नौदल आणि हवाई दलाच्या तिन्ही प्रमुखांना पाकिस्तानवर लष्करी कारवाई करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.

उद्या भारताने अचानक हल्ला केल्यास पूर्वतयारी म्हणून पीओकेतील शाळांमध्ये मुलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच हॉटेल्स, विवाह सोहळ्यांचे हॉल आणि शाळा येथे सैनिकांची राहण्याची व्यवस्था केली जात आहे. पीओकेतील १००० पेक्षा अधिक मदरसे बंद करण्यात आले असून प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळील परिसरात दोन महिने पुरेल इतके अन्नधान्य साठवून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यातून पाकचे धाबे दणाणले आहे, हेच दिसून येते. भारताने लष्करी कारवाई केल्यास तेथील सरकारविरोधात नाराज जनतेच्या असंतोषात भरच पडेल. पीओकेतील अनेक लोकांना खरे तर भारतातच सामील व्हायचे आहे!

दहशतवाद्यांना प्रशिक्षण देणारी अनेक केंद्रे तिथे असून, १५० ते २०० प्रशिक्षित दहशतवादीही आहेत. लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीन, जैश- ए-मोहम्मद अशा अनेक संघटनांना तेथे पाकिस्तानी लष्कराचे पाठबळ आहे. भारताने हल्ला केल्यास अणुहल्ला करू, अशी धमकी पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी दिली होती. पण अनेक वर्षे अशा पोकळ धमक्या दिल्या जात असून भारताकडे पाकिस्तानपेक्षा अधिक अण्वस्त्रसाठा आहे. आता भारताने सिंधू पाणीवाटप कराराचे उल्लंघन केले, तर पाकिस्तान भारतावर हल्ला करेल, अशी नवी धमकी आसिफ यांनी दिली आहे. पण प्रत्यक्षात पाकिस्तानचे अवघे सरकारच घाबरून गेले आहे. इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले होते आणि आता मोदी यांच्या नेतृत्वाखालील देशाचे आणखी तुकडे होतील, या भीतीने पाकिस्तानची गाळण उडाली आहे! पहलगाम घटनेशी काहीच संबंध नाही, असा आव पाकिस्तानने आणला असला, तरीही भारताच्या राष्ट्रीय तपास यंत्रणा यंत्रणेने (एनआयए) हल्ल्यासंबंधी महत्त्वाचे पुरावे गोळा केले. त्यावरून हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे स्पष्ट झाले होते. शिवाय पहलगाम कांडामागे पाकिस्तानचा हात असल्याचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी उघडपणे अमेरिकेचे संरक्षणमंत्री पिट हेगसेथ यांना दूरध्वनी संभाषणावेळी सांगितले आहे. शिवाय २६/११ चा मुंबईवरील हल्ला पाकिस्ताननेच केल्याची कबुली माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी दिली होती.

पाकिस्तानचे माजी अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनीही 'आम्ही दहशतवाद्यांना प्रशिक्षण देतो' असे म्हटले होते आणि आता दहशतवादी संघटनांना पाठबळ दिल्याचा इतिहास पाकिस्तानला असल्याचे उघड गुपित आहे. त्यामुळे देशाला त्रास झाला आहे, अशी कबुली पाकिस्तान पीपल्स पार्टीचे प्रमुख बिलावल भुत्तो यांनीही दिली आहे. तरीही अफगाणिस्तान, इराकसारख्या देशांतील विशिष्ट राजकीय परिस्थितीच्या संदर्भात, अमेरिकेने पाकिस्तानचा गरजेनुसार वापर करून घेतला आणि त्याच्या भारतविरोधी दहशतवादाकडे दुर्लक्ष केले. पण ९/११ चा हल्ला झाल्यापासून अमेरिकेचा दृष्टिकोन बदलला आहे.आता भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराला आणि दहशतवादाविरोधी लढाईला अमेरिकेचा पाठिंबा असल्याची ग्वाही अमेरिकेचे संरक्षण सचिव हेगसेथ यांनी दिली आहे. मात्र पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देताना त्याचे रूपांतर व्यापक प्रादेशिक समस्येत होणार नाही, याची काळजी घेण्याची सूचना अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी केली आहे. त्याचवेळी पाकच्या भूमीवरून आगळीक करणार्या दहशतवाद्यांवर कारवाई करण्यास पाकिस्तान भारताला सहकार्य करील, अशी अपेक्षाही व्हान्स यांनी व्यक्त केली आहे! वास्तविक तशी शक्यता बिलकुल नाही.

याबाबतीत अमेरिकेनेच वजन खर्च करून पाकिस्तानवर दबाव आणला पाहिजे. भारताच्या विरोधातील हिंसक कारवाया न थांबवल्यास कोणतीही आर्थिक व शस्त्रास्त्रांची मदत करणार नाही, असे अमेरिकेने पाकिस्तानला ठणकावले पाहिजे. प्रत्यक्षात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकेपुढेच आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अशावेळी भारत-पाकिस्तान युद्ध झाल्यास त्याचा भारतासोबतच्या व्यापारास फटका बसेल, ही अमेरिकेसमोरची खरी भीती आहे. एकीकडे पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय रसद कमी करणे आणि भारताच्या कोणत्याही कारवाईस नि:संदिग्ध पाठिंबा देणे, हीच आज अमेरिकेकडून अपेक्षा आहे. बदलत्या परिस्थितीत पाकिस्तानवरील दबाव वाढतो आहे. दहशतवाद्यांच्या पाठीराख्यांचा बंदोबस्त करण्याची हीच योग्य वेळ आहे.

# टोमॅटो पिकावर विषाणूजन्य रोग होऊ नये म्हणून काय कराल?

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

टोमॅटो पिकावरी विषाणूजन्य रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी, रोगप्रतिकारशक्ती असलेले वाण वापरासह तण नियंत्रणात ठेवणे, रसशोषक किडींवर नियंत्रण ठेवणे आणि रोगग्रस्त झाडे आणि फळे वेळीच नष्ट करणे, आदी कामे करावी लागतात. आणखी उपाययोजना करणे गरजेचे ठरते, ते पाहुयात...




लागवडीवेळी वाफ्यावर आच्छादनासाठी पांढरा, पिवळा, चंदेरी-काळा किंवा निळ्या रंगाच्या प्लॅस्टिक पेपरचा वापर करावा.

विषाणूजन्य रोगांचा प्रसार काही तणे, फुलझाडांमार्फत होत असल्याने टोमॅटो पीक तसेच बांध तणविरहित व स्वच्छ ठेवावेत.

रोगाची लक्षणे दिसताच रोगग्रस्त झाडे, फळे काढून जाळून नष्ट करावीत.

**जैविक नियंत्रण**

फळधारणेनंतर जैविक कीडनाशकांचा वापर करावा.

टोमॅटो, मिरची, ढोबळी मिरची, वांगी, गाजर, काकडी, खरबूज, कलिंगड, भुईमूग, बटाटा, उडीद, सोयाबीन, मूग, पपई, कापूस, भोपळा, केळी, बीट, पालक ही टोमॅटो पिकातील विषाणूजन्य रोगांची यजमान पिके आहेत.

या पिकांत विषाणूजन्य रोगांची लागण झाली असल्यास, अशी रोगग्रस्त झाडे उपटून त्यांचा नायनाट करावा.

टोमॅटोची शेवटची तोडणी होताच संपूर्ण पीक काढून नष्ट करावे. पीक तसेच काही दिवस राहिल्यास रोगाचा प्रसार

किडींद्वारे नव्या टोमॅटो पिकात होऊन प्रादुर्भाव वाढतो.




## ५ आयुर्वेदिक नियमांप्रमाणे करा दिवसाची सुरुवात, आयुष्यच बदलेल! शंभर वर्षे जगाल

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

आयुर्वेद आपल्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. कारण आयुर्वेदात रोजच्या जगण्यासंबंधी आणि आरोग्यासंबंधी अनेक महत्वाच्या गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. म्हणूनच आयुर्वेदाला आरोग्याचा खजिना मानलं जातं. आयुर्वेदात सांगण्यात आलं आहे की, शरीराच्या नॅचरल रिदमला मेंटेन करण्यासाठी सकाळी काही नियमांचं पालन करणं गरजेचं असतं. हे नियम पाळले गेले तर दिवसभर तुम्हाला एनर्जी मिळेल, तुम्ही सकारात्मक रहाल आणि तुमची तब्येतही अनेक वर्ष टणटणीत राहणार.

**विषारी तत्व बाहेर काढा-** आयुर्वेदानुसार, सकाळी शरीरातून विषारी तत्व बाहेर काढले पाहिजेत. यासाठी सगळ्यात आधी ब्रश करावा, त्यानंतर एक ग्लास कोमट पाणी प्यावं आणि त्यानंतर टॉयलेटला जावं. यानं पोट साफ होण्यास मदत मिळेल. प्रयत्न करा की, टॉयलेट जाण्याची तुमची रोजची वेळ एकच असावी.

**जीभ साफ करा-** आयुर्वेदानुसार, सकाळी दात स्वच्छ करण्यासोबतच जिभही स्वच्छ करणं गरजेचं असतं. यासाठी हळूहळू जिभ ब्रशच्या मदतीनं किंवा बोटांच्या मदतीनं घासा. यानं इंटरनल ऑर्गन चांगले राहतात आणि सोबतच डायजेशन सिस्टीमही चांगली राहते. असं केल्यानं जिभेवरील मृत पेशीही निघून जातात.

डोक्याची मालिश

आयुर्वेदात सांगण्यात आलं आहे की, सकाळी डोक्याची हलकी मालिश करणं खूप फायदेशीर ठरू शकतं. यानं डोक्यातील ब्लड सर्कुलेशन वाढून तुमचा स्ट्रेस कमी होईल. तसेच केसांसंबंधी अनेक समस्याही दूर होतील. असं म्हटलं जातं की, गरम तेलानं डोक्याची मालिश केल्यानं डोकेदुखी, टक्कल पडणे, केसगळती या समस्या दूर होण्यास मदत मिळते.



**एक्सरसाईज** -आयुर्वेदात एक्सरसाईजला सुद्धा खूप महत्व आहे. खासकरून रोज योगाभ्यास करण्याला प्राधान्य दिलं जातं. कारण योगा करून शरीराच्या सगळ्या मसल्स ॲक्टिव होतात. आयुर्वेदानुसार, रोज सकाळी सूर्य नमस्कार करून दिवसाची सुरूवात करावी. यानं पूर्ण शरीराचा व्यायाम होतो आणि दिवसभर एनर्जी सुद्धा मिळते.

**श्वास घ्या आणि ध्यान लावा**

सकाळी झोपेतून लवकर उठून मोठा श्वास घ्या आणि काही वेळ ध्यान लावून बसा. यानं तुमच्या मनातील नकारात्मक विचार बाहेर येतील. तसेच विचारांवर कंट्रोल करण्यास मदत मिळेल. तसेच श्वासासंबंधी अनेक समस्याही दूर होतील.

# नोकरीची संधी: कृषी विद्यापीठातील पदभरतीला दुसऱ्यांदा मुदतवाढ

## गट क व ड संवर्गातील ६८० पदांसाठी आता , १० मेपर्यंत अर्ज दाखल करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अकोला-** राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रिक्त पदांपैकी ५० टक्क्यांची प्रकल्पग्रस्तांमधून पदभरती करण्यास शासनाने मंजुरी दिली. त्यानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात गट क व ड संवर्गातील एकूण ६८० पदे भरली जाणार आहेत. त्यासाठी १० मार्चपासून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत दुसऱ्यांदा १५ दिवसांची वाढ केली. आता १० मेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. सध्या विविध पदांसाठी ११०० च्या अर्ज प्राप्त झाल्याची माहिती आहे.राज्यातील कृषी विद्यापीठातील गट क आणि ड संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे त्याच कृषी विद्यापीठातील बाधित प्रकल्पग्रस्तांमधून भरण्यासाठी विशेष भरती प्रक्रिया राबविण्यास शासनाने परवानगी दिली. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाद्वारे ज्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रत्यक्षात जमिनी संपादित केलेल्या आहेत, त्या प्रकल्पबाधित कुटुंबामधून प्रकल्पग्रस्तांचा सरळसेवेचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष भरती प्रक्रिया राबवली जात आहे. पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करण्याची लिंक १० मार्चपासून उपलब्ध करून दिली.पदभरतीमध्ये प्रवर्गनिहाय



सामाजिक व समांतर आरक्षण लागू राहणार आहे. कृषी विद्यापीठात गट क ची कनिष्ठ संशोधन सहाय्यक ३०, कृषी सहाय्यक (पदवीधर) सात, कृषी सहाय्यक (पदविका) ३४ असे ७१ पदे, वरिष्ठ लिपिक पाच, शाखा सहायक ३९, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पाच, ग्रंथालय सहायक एक, वरिष्ठ यांत्रिक चार, कनिष्ठ यांत्रिक सहा, पंप परिचर दोन, वाहन चालक १८ असे ८०, प्रयोगशाळा परिचरचे एकूण ३९ पदे, परिचरची ८०, चौकीदारची ५० पदे, ग्रंथालय परिचरची ५ पदे, माळीचे आठ पदे, मत्ससहाय्यक एक पद, व्हॉलमनची दोन पदे व मजुरांची सर्वाधिक ३४४ पदे असे एकूण ६८० पदांसाठी मेगा पदभरती कृषी विद्यापीठात होणार आहे. अर्ज दाखल करण्याची मुदत आणखी १५ दिवसांनी वाढवली असून आता १० मेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. विविध पदांसाठी आतापर्यंत ११०० च्यावर उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे यांनी सांगितले.


प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात दिरंगाई

प्रकल्पग्रस्तांमधून होणाऱ्या कृषी विद्यापीठातील पदभरतीसाठी अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली. प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र मिळवण्यात वेळ लागतो. त्यामुळे अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ दिल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.

# महाराष्ट्रावर चक्राकार वाऱ्यांचा परिणाम, गारपीट होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** राज्यात आणि विशेषकरुन विदर्भात गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने गारपीट सुरू आहे. येत्या २४ तासात विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कमी दाबाचा पट्टा आणि चक्राकार वाऱ्यांच्या परिणामामुळे राज्यावर सध्या पावसाचे सावट आहे. मागील आठवड्यापासूनच राज्यात अवकाळी पावसाने ठाण मांडले आहे. राज्यातील कोणत्या ना कोणत्या भागात पाऊसच नाही तर वादळीवारा आणि गारपिटीचा फटका देखील बसला आहे. विदर्भातही वेगवेगळ्या ठिकाणी वादळीवारा



आणि गारपीटीचा फटका बसला आहे. गेले दोन दिवस नागपूर शहरात देखील वेगवेगळ्या भागात वादळीवाऱ्यासह गारपीट झाली. तर आता पुन्हा भारतीय हवामान खात्याने उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्रास आणि मराठवाड्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. पुढील काही दिवसांसाठी राज्यातील अनेक भागात पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# बुलढाण्यात अवकाळीचे थैमान, वीज पडून जनावरे ठार; गारपीट पावसाने वऱ्हाड्यांची दैना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६बुलढाणा :** हवामान खात्याने दर्शविलेला अवकाळी पावसाचा अंदाज मर्यादित स्वरूपात का होईना खरा ठरला. जिल्ह्यातील काही भागात अवकाळी पावसाने गारपीट, वाऱ्यासह हजेरी लावली आहे. दरम्यान, वीज पडून तीन पाळीव जनावरांचा मृत्यू झाला. यामुळे घाटावरील उन्हाळ्याचे चित्रच पालटले.

बुलढाणा जिल्ह्याच्या घाटावरील भागातील काही तालुक्यांत आज सोमवार, ५ मे रोजी संध्याकाळी निसर्गाचे हे अवकाळी थैमान पाहवयास मिळाले. लोणार शहर व तालुक्यातील अनेक गावांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. लोणार शहरात कमी पावसाने हजेरी लावली. मात्र बीबी या गावासह बीबी महसूल मंडळांतर्गत येणाऱ्या बहुतेक गावात, तसेच अन्य मंडळात अवकाळी चांगलीच हजेरी लावल्याचे वृत्त आहे. सिंदखेड राजा व मेहकर तालुक्याला जोडणाऱ्या बीबी गावात अवकाळी पावसाने मध्यम



### लग्नसमारंभांना फटका

परिणामी बीबी येथे आयोजित एका लग्नसमारंभाला चांगलाच फटका बसला. यामुळे नवरदेव नवरीसह वऱ्हाड्यांची तारांबळ उडाली. त्यांना धावपळ करीत नजीकच्या भागात आडोसा घ्यावा लागला.

स्वरूपाची हजेरी लावली. लोणार शहर व तालुक्यातील अनेक गावांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. पावसाच्या तुलनेत वाऱ्याचा वेग जास्त होता. या दरम्यान बीबी व लगतच्या गावात बोरी आकाराच्या गार पडल्या.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ६ मे २०२५ शहर/ग्रामिण


# ती अवैध राख हटवली नाही, मात्र ग्रीन नेटने झाकून ठेवली

## प्रशासन आणि जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीचा प्रताप

### राखेचे कण उडण्याचे प्रमाण आणखी वाढले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नांदगाव पेठ–** राष्ट्रीय महामार्गावरील रहाटगावजवळ जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या राखेचा साठा करून परिसरात पर्यावरणाचा गंभीर भंग केला आहे.या प्रकरणात प्रशासनाची भूमिका निष्क्रीय असल्याची जोरदार टीका नागरिकांकडून होत आहे.या राखेच्या साठ्यामुळे परिसरातील नागरिक आणि वाहनचालक यांना दररोज उडणाऱ्या राखेमुळे श्वास घेणेही कठीण झाले आहे. धुळीच्या लोटांमुळे अपघातांची शक्यता वाढली असून, आरोग्यावर होणाऱ्या परिणामांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.प्रशासनाने राख हटविण्याऐवजी त्या राखेवर ग्रीन नेट टाकून प्रकरण दडपण्याच्या प्रयत्न केला असून या गंभीर बाबींवर प्रशासनाने घेतलेली भूमिका चुकीची असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, या गंभीर समस्ये विरोधात उपविभागीय अधिकारी यांना 'ई संवाद' द्वारे तक्रार देण्यात आली होती. मात्र, त्या तक्रारीची प्रशासनाने केवळ दिखाऊ दखल घेतली. राख हटविण्याऐवजी, केवळ हिरव्या जाळ्या (ग्रीन नेट) टाकून प्रशासनाने आपली जबाबदारी संपविल्याचे दिसून येते. ग्रीन नेटमुळे समस्या कमी होण्याऐवजी अधिक गंभीर होत आहे. कारण वाऱ्याच्या प्रवाहा मुळे राख सहज उडत असून, ग्रीन नेटचा उपयोग केवळ दिखावा करण्यासाठी केल्याचे स्पष्ट होते. नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या या उदासीनते विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे केवळ पर्यावरण ाचे नव्हे तर सार्वजनिक आरोग्याचेही गंभीर संकट आहे. जर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.या प्रकरणात प्रशासन, पर्यावरण विभाग आणि जिल्हा अधिकाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून जांडू कन्स्ट्रक्शनकडून राख हटवून घेणे, दोषींवर कारवाई करणे ही नागरिकांची मागणी आहे.

### प्रशासनाने राखेचा ढीग सील करावा

महामार्गालगत असलेल्या राखेच्या ढिगाऱ्यावर शासन, प्रशासन कारवाई करण्यात असमर्थता दाखवत असून या उडणाऱ्या राखेमुळे वाहनचालक आणि नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. माध्यमांनी ही बाब प्रशासनाच्या लक्षात आणून देऊन तसेच तक्रार देऊन सुद्धा प्रशासन कारवाई करत नसेल तर ही बाब चिंताजनक आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन राखेचा ढिगारा सील करावा अन्यथा याविरोधात आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल.

**नितीन हटवार**

**तालुका प्रमुख,शिवसेना (उबाठा) अमरावती.**

# घरकुल,मुद्रालोन, दलित वस्तीच्या समस्या घेवून सर्वसामान्य नागरिक पोहोचले जनता दरबारात

## खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड.यशोमतीताई ठाकूर, बबलू देशमुख, वीरेंद्र जगताप यांचा पुढाकार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–**

प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज विनंत्या, तक्रारी करून तसेच शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवूनसुद्धा न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेकडो नागरिकांनी काँग्रेसच्यावतीने आयोजित जनता दरबारात आपली कैफियत , समस्या मांडल्यात, खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, शहराध्यक्ष बबलू शेखावत आदींनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडविण्याबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा सुरू केला. सर्वसामान्य, गरीब नागरिक, बेरोजगार युवक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच महिला वर्गाने या जनता दरबारात उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्याा.खासदार बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली यशोमतीताई ठाकूर यांच्या गणेडीवाल लेआउट स्थित निवासस्थानी सोमवारी सकाळी ९ पासून जनता दरबार सुरू झाला. यावेळी वीज वितरणकंपनी, कृषी विभाग, महसूल विभाग, आरोग्य विभागाशी संबंधित अनेक गाऱ्हाणी नागरिकांनी मांडल्यात.विशेष म्हणजे अनेक सुशिक्षीत बेरोजगार सुद्धा रोजगाराची मागणी घेवून त्याठिकाणी आले होते. सरकारकडून देण्यात आलेली आश्वासने फोल ठरत असल्याने निराश झालेल्या नागरिकांनी आपल्या व्यथा खासदार बळवंत वानखडे, ॲड,यशोमतीताई ठाकूर यांच्या समोर मांडल्यात. शिवाय तलाठी पदाची पदभरती व इतर विभागातील भरती होत नसल्याने अनेकांच्या पदरी निराशा आली होती. मात्र खासदार श्री. वानखडे, यशोमतीताई ठाकूर यांनी त्या ऐकून घेत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत त्यांच्या वेदनांवर फुंकर घातली.

### क्राँग्रेस भवन फुलले .....

.माजी मंत्री ॲड.यशोमतीताई ठाकूर यांच्या निवासस्थानी आयोजित जनता दरबाराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यानंतर दुपारी १२ पासून स्थानिक काँग्रेस भवन येथे खासदार बळवंत वानखडे, यशोमतीताई ठाकूर, बबलू देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप आदींच्या उपस्थितीत नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्यात. खासदारांकडून संबंधित अधिकाऱ्यांना फोन वरून तसेच प्रत्यक्षात पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले. आपल्या समस्या घेवून आलेल्या शेकडो नागरिकांमुळे काँग्रेस भवनचा परिसर गर्दीने फुलून गेला होता.

# सातपुड्याच्या पायथ्याशी शाहपूर जंगलात गर्भवती वाघिणीचा संशयास्पद मृत्यू

## मध्यप्रदेशातील बुरहानपुर जिल्ह्यात वाघाचा चौथ्यांदा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मेळघाट–** महाराष्ट्रातील सातपुडा पर्वताला लागूनच असलेल्या मध्यप्रदेशाच्या शाहपुर वनपरिक्षेत्रातील जम्बुपाणीच्या जंगलात ४ मे रोजी एका गर्भवती वाघिणीचेशव प्राप्त झाल्यानेएकच खळबळ माजलेली आहे. मृत्यूचे कारण अद्याप समजले नसले तरी करंट लागून वाघिणीचा मृत्यू झाल्याची आशंका आहे. पोटातील तीन शावक सुध्दा बळी ठरले, हे दुर्देवच.भारतात टायगर स्टेट म्हणून नामांकित असलेल्या मध्यप्रदेशातील मेळघाटच्या जंगला जवळच्या बुरहानपुर जिल्ह्यातील जम्बुपाणीच्या जंगलात ४ मे रोजी एक गर्भवत्नी वाघिण मृत सापडली. वनमंडळ अधिकारी विद्या भुषणसिंग यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे अंदाजे तीन दिवसांपूर्वी वाघिणीचा मृत्यू झाला असावा. माहिती मिळताच राष्ट्रीय बाघ सरंक्षण प्राधिकरणाचे (एनटीसीए) डॉ. प्रशांत देशमुख, मुख्यवनसरंरक्षक रमेश गनावा (खंडवा), तथा वनमंडळ अधिकारी विद्या भुषणसींग हे स्थानिक पदाधिकाऱ्यांसमोर शवदाह भस्मीकरण प्रक्रिया करण्यात आली. प्रथम दृष्य शिकारची घटना वाटत नसली तरी गुन्हा कायम करून तपास सुरू करण्यात आला. बुरहानपुर जिल्ह्याला लागलेल्या महाराष्ट्रातील जंगला जवळ घटना घडल्याने मृत्यूमुखी पडलेली वाघिण स्थलांतरित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. वन्यजीवांपासून सरंक्षणासाठी शेताच्या धुऱ्यावर जिवंत इलेक्ट्रीक कुंपन करण्याची परंपरा या भागात असल्याने त्या दिशेने देखील तपास होत आहे. वाघिणीचे सर्व अववये साबुत असल्याने हा संशय वाढलेला आहे. शाहपुरचे रेंजर संजय मालवीय आपल्या सहकाऱ्यांसोबत वाघिणीच्या मृत्यू विषयी वेगवेगळ्या एंगलने चौकशी करत आहेत. या भागात प्रतिबंधित सालई डिंक तस्कररावण सकार असतात, हे विशेष. तीन वर्षापूर्व धारणीच्या मध्यप्रदेशच्या सीमेवरील खकनारच्या जंगलात बारातांडा जवळ एक वाघ आगीत खाक झालेला आढळ आला होता. त्याचे पंजा,दात मिशा, नखे व शेपटी गायब होते विशेष.

# महिलासंबंधी दाखल गुन्ह्यांचा पोलीस आयुक्तांनी घेतला आढावा

## प्रलंबित गुन्ह्यांवर तपास अधिकाऱ्यांची कानउघाडणी



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती–** महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्यांचा पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी आढावा घेतला. तसेच प्रलंबित गुन्ह्यांती संख्या लक्षात घेता तपास अधिकाऱ्यांची कान उघाडणी केली. ४० दिवसांच्या आत प्रलंबित गुन्हे निकाली काढण्याचे आदेश दिले.

नवीन कायद्यानुसार महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्यात तपास अधिकाऱ्यांनी तत्काळ आरोपीला अटक करावी. तसेच तपासपूर्ण करून ६० किंवा ९० दिवसात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करावे, असे नमुद आहे. परंतु आयुक्तालयातील १० पोलीस ठाण्यांतर्गत महिला संबंधित दाखल असलेल्या गुन्ह्यात संबंधित तपास अधिकाऱ्यांनी ठोस कारवाई न करता गुन्हे प्रलंबित ठेवल्याचे दिसून येताच पोलीस आयुक्तांनी आयुक्तालयातील डिसीपी, एसीपी तसेच सर्व ठाणेदारांसह शाखा प्रमुखा व तपास अधिकाऱ्यांची बैठक घेतली.यावेळी प्रथम महिला अत्याचाराशी संबंधित दाखल असलेल्या गुन्ह्यांचा तसेच प्रलंबित गुन्ह्याचा आढावा घेतला. दरम्यान प्रलंबित गुन्ह्यांची संख्या पाहता आयुक्तांनी संबंधित गुन्हे प्रलंबित ठेवण्यामागील कारणांची विचारणा केली. परंतु कोणीच सामाधानकारक उत्तरे दिली नाही. आयुक्तांनी तपास अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले. विनयभंग, छेडखानी, अत्याचार अशा काही गंभीर गुन्ह्यातील आरोपींना अटकच केलेली नसल्याचे पाहता आयुक्त आणखीच संतापले. तपास करण्यात काही अडचणी येत आहे का, आरोपी अटक का केले जात नाही, असे विचारत वरिष्ठ अधिकाऱ्यांसह गुन्हेशाखेची मदत घेण्याच्या सुचना तपास अधिकाऱ्यांना दिल्यात. ज्या गुन्ह्यात न्यायवैद्यक प्रयोग शाळेचा अहवाल किंवा वैद्यकीय पुरावे असेल अशा गुन्हात वेळ लागतो, परंतु छेडखानीच्या गुन्ह्यात तत्काळ तपासपूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात यावे, असे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी बैठकीत बजावले.

# सरपंचपदासाठी इच्छुकांना गाव विकासाचा कळवळा

## सरपंचपदाचे आरक्षण जाहीर होताच उमेदवार सक्रिय



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ पथ्रोट**

अचलपूर तालुक्यातील सर्वात मोठी १७सदस्य ग्रामपंचायत असलेल्या पोट गावात पुन्हा अनुसूचित जमाती सर्वसाधारण प्रवर्गातून असल्याने या प्रवर्गातील इच्छुकांना गाव विकासासाठी तळमळ जागृत झालेली दिसून येत आहे.

कधी न सामाजिक कार्यात न दिसणाऱ्याना सुद्धा सरपंचासह उपसरपंच सदस्यासाठी इच्छुक असलेल्यांना गावात विकासाची गंगा आणण्याची तळमळ त्यांच्या शब्दातून, बोलण्यातून दिसून येत आहे. आरक्षण जाहीर होताच सदर प्रवर्गातील इच्छुकांना सरपंच, उपसरपंच व सदस्य या पदावर आपण निवडून आलो पाहिजे, लोकांना विश्वासात कसं घ्यावं, लोकांशी जवळीकता कशी साधावी, एकमेकाबद्दल झालेली कटूता दूर करण्याचा प्रयत्न करून गावात विकासाची गंगा आणून गाव विकासाच्या शिखरावर कसे पोहोचू शकतो, अशा गप्पागोष्टी गावातील चौपाटीवर सुरू झाल्या आहेत. आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी पथ्रोट येथे पहिल्यांदाच बेट निवडणूक होणार आहे. त्यासाठी आपल्याच गटाचा सरपंच कसा होईल, यासाठी सुद्धा राजकीय पक्षाच्या पदाधिकार्यांनी उमेदवाराची चाचपणी सुरू आहे. विश्वासातला उमेदवार असावा, आपल्या मर्जीने त्याने कारभार करावा, असा सुद्धा विचार करून उमेदवार उभा करण्याच्या तयारीत आहे.सरपंचपदासाठी थेट चौरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विविध उपक्रम राबवून गावात आपल्याकडे लोकांचा कल कसा वाढेल या दूरदृष्टीने आपल्या नेत्यांच्या, आमदार, खासदार लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून विविध शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी उपक्रम हाती घेतले जात आहे. ग्रामपंचायत आपल्या हाती राहिली तर जिल्हा परिषद वर सुद्धा सरकारमध्ये आपलीच बाजू भक्कम होईल या आशेने सुद्धा आपल्याच पॅनलचा थेट लढतीत सरपंच कसा निवडून येणार यासाठी सुद्धा प्रयत्न सुरू झाल्याचे चित्र सध्या गावात दिसून येत आहे. मात्र, त्याहीपेक्षा गावाच्या विकासाचा कळवळा इच्छुकांमध्ये वाढला आहे.

# ग्रिस्टॅक योजनेंतर्गत 'शेतकरी ओळख क्रमांक' प्राप्त करण्याचे जाहीर आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** राज्य शासनाकडून ग्रिस्टॅक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना 'शेतकरी ओळख क्रमांक' तयार करणे अनिवार्य आहे. ग्रिस्टॅक योजने अंतर्गत प्राप्त होणारे शेतकरी ओळख क्रमांक हे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. हा शेतकरी ओळख क्रमांक जवळच्या नागरी सुविधा केंद्रातून पास होतो. शेतकरी ओळख क्रमांक असणा–या शेतक–यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता येईल, असे विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त अजय लहाने यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.'शेतकरी ओळख क्रमांक' च्या माध्यमातून पीएम किसान योजनेचा लाभ, पिक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड, कृषि पायाभूत सुविधा निधी, शेती विकासासाठी इतर कर्ज, पिक विमा, नैसर्गिक आपती नुकसान भरपाई, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतक–यांचे नोंदणीकरण, कृषि कर्ज, दिर्घ मुदती कर्ज, खते, किटकनाशके, बि–बियाणे, कृषि अवजारे आदी योजनांचा लाभ सुलभरित्या, पारदर्शकपणे व जलदगतीने शेतकऱ्यांना प्राप्त करता येईल.

उपरोक्त प्रमाणे अनेक शासकीय योजना, सेवा, सुविधा, इत्यादींचा लाभ घेण्यामध्ये ग्रिस्टॅक योजने अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अमरावती विभागातील सर्व शेतकऱ्यांनी ग्रिस्टॅक योजने अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा तसेच शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करण्यासाठी कोणतीही अडचण असल्यास संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहनही विभागीय आयुक्तालयच्या वतीने करण्यात आले आहे.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# विना शिक्षक व विना प्राचार्य असलेल्या ४९ महाविद्यालयांत शैक्षणिक प्रथम वर्ष प्रवेशावर बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती,–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२५–२६६ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नुकत्याच संपन्न झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सदस्य डॉ. आर.डी. सिकची यांनी विना शिक्षक व विना प्राचार्य असलेल्या ४९ महाविद्यालयांत शैक्षणिक सत्र २०२५–२६ पासून प्रथम वर्ष प्रवेशावर बंदी घालण्यासंदर्भात मुद्दा मांडला होता.त्यानुषंगाने ४९ महाविद्या लयांचे शैक्षणिक सत्र २०२५–२६ पासून प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला. प्रवेश बंदी घालण्यात आलेल्या ४९ महाविद्यालयांची यादी विद्यापीठा च्या संकेतस्थळावर महाविद्यालयीन विभागाच्यावतीने प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रवेश घेवू इच्छिणाऱ्याया संबंधित विद्यार्थी व पालकांना विद्यापीठाच्यावतीने सूचित करण्यात येते की, विना शिक्षक व विना प्राचार्य असलेल्या ४९ महाविद्यालयांत प्रथम वर्षाला कोणीही प्रवेश घेवू नये. बंदी घातलेल्या महाविद्यालयांत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या विद्यार्थ्यांची व पालकांची राहील, असे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे.

# २४ तासाच्या आत विनयभंगाचा गुन्हेगार कोर्टात सादर

## चांदूर रेल्वे पोलिसांची कार्यवाही



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७चांदूर रेल्वे** पोवास स्टेशन हद्दीत एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना रविवारी सकाळीघडली. फिर्यादीने दुपारी १२.४२ वाजता लेखी तक्रार दिल्यानंतर चांदूर रेल्वे पोलिसांनी २४ तासाच्या आत आरोपीला पकडुन दोषारोपपत्र तयार करून त्याला कोर्टात हजर केले.फिर्यादी महिला रविवारी सकाळी घरात घरकाम करीत असतांना घराशेजारी राहणाऱ्या आरोपीने तिच्या घरी कोणी नसल्याचा फायदा घेत घरात प्रवेश करून फिर्यादीचा विनयभंग केला. फिर्यादी महिलेने ४ मे रोजी दुपारी १२.४२ वाजता लेखी तक्रार दिल्यानंतर चांदूर रेल्वे पोलिसानी आरोपी विरूध्द कलम ३३३,७४,११५ (२) बी.एन.एस. अन्वये गुन्ह्याची नोंद केली. पोलिस निरिक्षक आकरे रेयांच्या यांच्या मार्गदर्शन मार्गदर्शनात पोहेकॉ. शिवाजी घुगे, पोहेकॉ. राहुल इंगळे, नापोकॉ. प्रशांत ढोके यांनी आरोपीचा गावात शोध घेतला. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असतांना त्याला पकडले, घटनास्थळाचा सरकारी पंचासमक्ष पंचनामा करून ई साक्ष मध्ये नोंद घेतली. तसेच फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांचे बयान नोंदविण्यात आले.त्याचप्रमाणे न्यायालयात कलम १८३बी. एस. एस. एस. प्रमाणे फिर्यादी चे बयाण नोंदविण्यात आले. घटनेच्या दिवशीच तपास करून आणि दोषारोपपत्र तयार करून सोमवारी ११ वाजता चांदूर रेल्वे न्यायालयात २४ तासाच्या आत दाखल केले. या प्रकरणाचा तपास एसपी विशाल आनंद, चांदूर रेल्वे एसडीपीओ अनिल पवार यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरिक्षक आकरे, महिला पोउपनि विना पंडे, पोहेकॉ. शिवाजी घुगे, राहुल इंगळे, प्रविण मेश्राम, नापोकॉ. प्रशांत ढोके यांनी केला.

# रखरखत्या उन्हात शिवसेनेच्या नेतृत्वात महिलांचा नांदगाव नगर पंचायतवर धडकला घागर मोर्चा

## नांदगावात पाणी टंचाई दहा दिवसाआड पाणी पुरवठा

### न प वर घागरी फोडून तीव्र आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६नांदगाव खंडेश्वर** हंडाभर पाण्यासाठी नांदगाव वासियांना रखरखत्या उन्हात पायपीट करावी लागत असून होत शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चांदी प्रकल्पात मुबलक पाणी साठा असतांना सुद्धा नगर पंचायतचे नियोजना अभावी १० ते १५ दिवसाआड पाणी पुरवठा केला जात असल्याने भीषण पाणी टंचाईच्या झळा नागरिकांना बसत आहे ठाकरे गटाच्या शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेकडो महिलांनि नगर पंचायत कार्यालयावर घागर मोर्चा काढून मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांना घेराव करुन कार्यालयातच घागरी फोडून महिलांनी संताप व्यक्त करत नियमित पाणी पुरवठा करण्याची मागणी केली नांदगाव शहरातील बोअरवेल विहिरी आटल्या त्यात नगर पंचायत मार्फत १० ते १५ दिवसा नंतर पाणी पुरवठा होत असल्याने महिला व नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे अनेक ठिकाणच्या बोअरवेल नादुरुस्त त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे नांदगाव शहरात इतर पाण्याच्या सोई उपलब्द नसल्याने पाण्यासाठी जावे तरी कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे नगर पंचायत प्रशासन पूर्ण वर्षभर ३६५ दिवसाचा पाणी कर वसूल करते मात्र महिन्याकाठी ३ दिवस वर्षभरात ३६ वेळा पाणी पुरवठा मिळत असतांना एक वर्षाचा पाणी कर भरावा तरी का असा जबाब नागरिकांनी नगर पंचायत प्रशासनाला विचारून यावेळी उडवा उडवीचे उत्तर दिल्याने प्रकाश मारोटकर यांनी पाणी पुरवठा अभियंता लोखंडे यांना चांगलेच धारेवर धरले तात्काळ नियोजन करून नियमित पाणी पुरवठा करावा अशी मागणी प्रशासना विरोधात प्रचंड नारेबाजी करत महिलांनी सोबत आणलेल्या घागरी नगर पंचायत कार्यालयातच फोडून आपला रोष व्यक्त केला आटलेल्या विहिरीत टँकरणी पाणी पुरवठा करावा तसेच नळाद्वारे येणाऱ्या पाण्याला फेस येत असून पाण्याचा दुर्गंध सुद्धा येतो जल शुद्धीकरण व पाण्याची टाकी नियमित साफ सफाई करण्यात यावी व शहराला किमान ३ दिवसाआड पाणी पुरवठा करावा अन्यथा नगर पंचायत कर्मचाऱ्याना बांगड्यां घालू असा इशारा निवेदन सादर करून दिला यावेळी प्रकाश मारोटकर माजी उपनगराध्यक्ष प्रीती इखार माजी सभापती रेखा नागोलकर रेवती परसंनकर निलेश इखार रवी ठाकूर सुनील गुरमुळे गुणवंत चांदुरकर मनोज ढोके चेतन डकरे गोपाल बनकर निलेश मारोटकर लीलाधर चौधरी चंदू कुकडे नामदेव सोनोने सुरज लोमटे राजु डोक सुमित लोमटे कृष्णा सपकाळ अक्षय मारोटकर शेख मेहताब अनिल बुदले प्रेम हिवराळे विजय पेटले विकास रावेकर विजय चौधरी बबलू सोनोने अक्षय हिवराळे शुभम रावेकर सचिन काकडे अनिकेत गटूले मेघा बनकर सविता सोनोने सुरेखा परसणकर कविता धांडे मंदाबाई नालट कल्पना बनारसे लता लोखंडे अनिता रावेकर सपना सपकाळ शोभा लाड आशा हिवराळे शोभा आत्राम चंदा कोल्हे कल्पना सोनोने लता हळदे अनिता भंडारे यांचेसह शहरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.



#### तीन दिवसात उपाय योजना करू

मुख्यधिकारीपाणीपुरवठा करणारे अभियंता कर्मचारी यांची तात्काळ बैठक घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत ३दिवसात उपाय योजना करू असे नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांनी मोर्चा दरम्यान सर्वांना आश्वस्त केले.–

#### जितके दिवस पाणी पुरवठा तेवढाच कर

:– प्रकाश मारोटकरनांदगाव शहरातील नागरिकांना अनेक वर्ष पाण्यासाठी संघर्ष करा लागला शासनाने कोटी रुपये खर्च करून चांदी प्रकल्प व शहरात संपूर्ण नवीन पाईप लाईन टाकली आणि मुबलक पाणी साठा असतांना नगरपंचायतच्या ढिसूळ कारभारामुळे नांदगाव वासियांना पाणी टंचाईच्या झळा पोहचत आहे यामुळे जेवढे दिवस पाणी पुरवठा तेवढाच कर वसूल करावा नागरिकांनी ३६५ दिवसाचा कर का भरावा.? असे मत शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी व्यक्त केले.

# महिला महाविद्यालय (कनिष्ठ विभाग) उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अमरावती द्वारा संचालित महिला महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थिनींनी सत्र २०२४–२५ मध्ये बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे व उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महिला महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही विद्याशाखा असून विद्यार्थिनींनी तिन्ही शाखेत उत्तम गुण मिळवून महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९३.३८% असून वाणिज्य शाखेचा १००%, विज्ञान शाखेचा ९६.२६% तर कला शाखेचा ८३.३३% निकाल आहे. विज्ञान शाखेतून स्वरा संजय कुऱ्हाडे (९२.३३%) ही प्रथम आली असून आस्था संजय कुऱ्हाडे, (८७.८३%) आणि अंतरा संतोष कोकाटे (८७.५०%) या अनुक्रमे द्वितीय व तृतीय आलेल्या आहे. वाणिज्य शाखेतून साची मनीष शर्मा ८९.१७% ही प्रथम, चंचल दत्ता साखरकर ७४.६७% ही द्वितीय आणि तृप्ती संजय वायरे ७०.५०% ही तृतीय आलेली आहे. तसेच कला शाखेतून कस्तुरी अजय शेरेकर ७५.६७%, अश्विनी मनोज मेश्राम ७३.६७% आणि भूमिका सिद्धार्थ खोब्रागडे ७३.३३% ह्या अनुक्रमे प्रथम , द्वितीय व तृतीय आलेल्या आहेत. याप्रसंगी सर्व विद्यार्थिनींनी त्यांच्या यशाचे श्रेय आपले गुरुजन आणि पालकांना दिले. प्राध्यापकांनी विद्यार्थिनींना योग्य मार्गदर्शन केल्यामुळेच विद्यार्थिनी हे यश संपादन करू शकल्या तसेच अभ्यासक्रमाबरोबरच महाविद्यालयात बारावीच्याविद्यार्थिनींकरिता राबविले जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा तसेच टेस्ट सिरीज चा फायदा विद्यार्थिनींना झाल्याचे प्रांजळ मत पालकांनी आणि विद्यार्थिनींनी यावेळी व्यक्त केले. परीक्षेची तयारी तसेच व्यक्तिमत्व विकास या संदर्भात तज्ञ मार्गदर्शकांकडून आणि प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांच्याकडून विद्यार्थिनींना मिळालेले मार्गदर्शनही तेवढेच महत्त्वाचे होते असे आवर्जून पालकांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचे अभिनंदन आणि विद्यार्थिनींचे कौतुक केले. पालकांनी त्यांच्या पाल्यांकरिता महिला महाविद्यालयाची निवड केल्यामुळेच महाविद्यालयातील सर्व भौतिक सुविधा, सुसज्य ग्रंथालय, दृकश्राव्य सोयी या सर्व बाबींचा विद्यार्थिनींना त्यांच्या अभ्यासाकरिता उपयोग होऊ शकला, याकरिता प्राचार्यांनी पालकांचे अभिनंदन केले. महिला महाविद्यालयाची पालकसंस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. मायाताई शिराळकर, सचिव प्रा. निनाद सोमण व कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी देखील विद्यार्थिनींच्या यशाचे भरभरून कौतुक केले आहे. उपयुक्त सोयी सुविधा तसेच अभ्यासाला पोषक अशा सर्व बाबी संस्थेतर्फे विद्यार्थिनींना कायम पुरवल्या जातात. त्यामुळे महाविद्यालयात सर्वोच्च अध्यापन प्रक्रिया राबवली जाते असे कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते यांनी सांगितले. कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनींना महिला महाविद्यालयातच पीएचडी पर्यंतच्या शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याने अनेक विद्यार्थिनींनी महिला महाविद्यालयातच प्रवेश घेण्याचा मनोदय यावेळी बोलून दाखविला. बारावी निकालाच्या बाबतीत विद्यार्थिनींनी उत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे.सर्व स्तरावरून विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.–

## आदिवासी समाज विकास संघटना कृती समितीचा

# तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाला विरोध !



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६धारणी:७**मेळघाटातील सर्वात मोठ्या व तितक्याच वादग्रस्त करत असलेल्या तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाला आता आदिवासी समाज विकास संघटना कृती समितीच्यावतीने हो विरोध सुरु झाला आहे याबाबत उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मेळघाट व मध्यप्रदेशच्या सीमेवर तापी नदीवर खाऱ्या पुटीघाट येथे तापी नेगा रिचार्ज प्रकल्प होणार असल्याची चर्चा असल्याने मेळघाटमधील विविध संघटना सक्रिय झाल्या आहेत.याबाबत प्रशासनाकडून सविस्तर तसेच योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही त्यामुळे समज–गैरसमज निर्माण होत आहेत. आदिवासी संघटनेने सहायक जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की, सदरहू प्रकल्पामध्ये मेळघाटमधील सुपीक जमीन जाईल अनेक कुटुंबे बेघर होतील. मेळघाटमधील आदिवासीची कोरकू संस्कृती येथून पुनर्वसन झाल्यावर लयास जाईल.मेळघाटातील चिखलदरा व धारणी हे दोन्ही तालुके पेसा अंतर्गत असल्याने या ठिकाणी पाचवी व सहावी अनुसूची लागू आहे. त्यानुसार गाव ग्रामसभा व्या परवानगी शिवाय शासनाया कुठलाही प्रकल्प मंजूर करता येत नाही असे असतानासुद्धा महाराष्ट्र शासनाने तापी मेगा रिचार्ज प्रकल्पासाठी मंजूर केला. या मेगा प्रोजेक्टसाठी तब्बल १९ हजार ३०० कोटी रुपये मंजूर केल्याची चर्चा आहे. या प्रकल्पामुळे मेळघाटातील गावेच्या गावे उद्ध्वस्त होतील मेळघाटातील मूळ आदिवासी संस्कृती धोक्यात येईल. आदिवासींचे जीवनमान उंचावण्याऐवजी त्यांचा विकास खुटेल. म्हणून तापी मेगा रिचार्ज प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी मेळघाटमधील आदिवासी विकास संघटना कृती समन्वय समितीने केली आहे.यावेळी कृती समितीचे सदस्य दिलीप जावरकर, राम गोपाल मावसकर, हिरालाल मावसकर, गंगा जावरकर, रामू झारेकर, हरिचंद भिलावेकर, राजू पटोरकर, यशवंत मोड, कासदेकर व संघटनेचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# तिवसा येथील कुस्तीपटू मुलीचे हृदयविकाराने निधन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६तिवसा** – शहरातील आजाद चौकातील रहिवाशी तथा पंचशिल क्रीडा मंडळाची कुस्तीपटूप्राप्ती सुरेश विघ्ने (वय२२) हिचा सोमवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.प्राप्त माहितीनुसार, प्राप्ती हिला उलट्या व पाय दुखण्याचा त्रास झाल्याने मी घरी येत आहे, असा फोन तिने भावाला केला होता. भावाने तिला अमरावती येथून सकाळी ९.३० वाजता घरी आणले.घरी विश्रांती घेत असतानाच अचानक तिची प्रकृती बिघडली. तातडीने तिला तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.तपासणी अंती डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. वाटेतच हृदयविकाराच्या झटक्याने तिचा मृत्यू झाला.तिवसा पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. प्राप्तीचे वडील हे भाजीविक्रेते असून आई मजुरीचे काम करते. अल्पवयात मुलीच्या निधनामुळे विघ्ने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातही सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालयानी राखली यशाची परंपरा कायम




**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** स्थानिक शैक्षणिकक्षेत्रात नामवंत च प्रख्यात असलेल्या विद्याभारती शैक्षणिक मंडळ कॅम्प अमरावती व्दारा संचालित विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय, कॅम्प अमरावती येथील उच्च माध्यमिक परिक्षेचा निकाल सोमवार दुपारी १.०० वाजता ऑन लाईन जाहिर झाला.या बोर्ड परिक्षेचा निकाल कला शाखा ८९.३६%, वाणिज्य शाखा ९७% व विज्ञान शाखा ९७.९६% एवढा लागला असुन महाविद्यालयाने आपली गौरवशाली निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेतून ९१.८३% मिळवुन ताहुर अहमद फैझल खान प्रथम आलेला आहे. वाणिज्य शाखेतुन ९२.८३% मिळवुन प्रथमेश गजानन पाटील व कला शाखेतुन ९१.५०% मिळवुन कु तनिष्का विशाल मसराम प्रथम आले आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकुण निकालात विज्ञानशाखेतुन ३७ विद्यार्थी, वाणिज्य शाखेतून ५९ विद्यार्थी व कला शाखेतून ०७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले आहेसर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय महाविद्यालयात होणा–या प्रत्येक प्रकरणांवरील चाचणी परीक्षा, अर्ध व पुर्ण अभ्यासक्रमांवर सराव परिक्षा, व्ही.बी.एस.पी. परिक्षा पध्दत, पालक व विद्यार्थ्यांशी शिक्षकांचा सतत संपर्क, अनुभवी शिक्षकांकडुन विद्यार्थ्यांना मिळणारे वर्षभरातील मार्गदर्शन, अभ्यास विषयक, व्यक्तिमत्य विषयक समस्यांचे निराकरण व नियमित सराव या मध्ये सातत्य ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत निरंतर वाढ झाल्याचे दिसुन येते अशी प्रतिक्रिया महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रज्ञा येनकर यांनी व्यक्त केलीसंस्थेचे अध्यक्ष रावसाहेब शेखावत उपाध्यक्ष मेजर डॉ.मिथीलेश राठौर, सचिव डॉ ए.डी. चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे उप्राचार्य श्री. एच. के सिसोदिया यांच्यासह सर्व शिक्षकांनी सगळ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी सुयश चिंतिले आहे.

# अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ११ संचालकांची दिलेली माहिती धादांत खोटी

# लावलेले आरोप खोटे व राजकीय व्देषापोटी – उपाध्यक्ष अभिजीत ढेपे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती–** अमरावती जिल्हा मध्यवती बँकेच्या संचालक मंडळाची सभा दि.३०.०४.२०२५ रोजी पार पडली. या सभेमध्ये धोरणात्मक कुठलेही निर्णय नव्हते. फक्त कार्यालयीन विषय जे नाबार्ड व आर.बी.आय. यांना संचालक मंडळ सभेच्या मान्यतेने स्टेटमेंट व इतर माहीती वेळेच्या आंत पाठविणे गरजेचे व बंधनकारक असते असे विषय होते. बँकेने संपुर्ण माहीतीसह विषय सभेसमोर मान्यतेकरीता ठेवले. परंतु राजकीय व्देषापोटी हे विषय ११ संचालकांनी हेतुपुरस्पर नामंजुर केले असल्याची माहिती जिल्ह्या मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्या बँकेने कुठलेही ठराव खोटे लिहीलेले नाही. प्रेसनोट मध्ये जे विषय ११ संचालकांनी नमुद केले की, विषय क्र.०८ ला मान्यता दिली, वास्तविक पाहता हा विषय नाबार्डच्या अहवालाचे अवलोकन करण्याचा होता व नाबार्डच्या अहवालाला मान्यता देण्याचा कुठलाही अधिकार संचालक मंडळास नाही. त्यामुळे त्यांचे हे कथन सुध्दा खोटे आहे. विषय क्र.०७ हा ॲप्रेन्टीस विद्याथी घेण्यासंबधाने होता व यामध्ये जाहीरात देऊन प्राप्त होणारे अर्ज संचालक मंडळ सभेसमोर ठेवण्याचा ठराव पारीत झाला आहे. विषय क्र.२४ हा जादाची प्रोव्हीजनचा जमाखर्च घेण्याबाबत होता व ११ संचालकांनी सुचविल्याप्रमाणे बँकेने सी.ए. यांचे मत टिपणी सोबत सुध्दा जोडलेले होते. तसेच विषय क्र. ४० हा भापकी सेवा सहकारी संस्थेला नाबार्ड योजने अंतर्गत गोडाऊनकर्ज देण्यासंबधाने होता. हि संस्था



मागील ३० वर्षापासुन पूर्णतः फायदयात आहे व या विषयाचा उपस्थित संचालक व माजी अध्यक्ष यांनी सुध्दा कर्ज मंजुर करावे असे सुचविले होते व त्याप्रमाणे सदरचा विषय मंजुर करण्यात आला. त्यामुळे हे सर्व विषय कार्यालयीन विषय असल्यामुळे खोटे ठराव लिहले असा आरोप धादांत खोटा व राजकीय व्देषापोटी केलेला आहे.श्री काळबांडे यांना विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी सहकार कादयाने अपात्र केले आहे व मा. सहकार मंत्री महोदयांनी सुध्दा त्यांची सदस्यत्व अपील खारीज केलेली आहे. ते संचालक म्हणुन अपात्र असल्यामुळे त्यांना नोटीस दिलेली नाही. अशा अपात्र संचालकाच्या कारणावरून शेतकऱ्यांच्या बँकेस व शेतकऱ्यांच्या हितार्थ निर्णयांना विरोध करणे योग्य नाही. बँकेच्या आर्थिक उलाढालीमध्ये वाढ झालेली असुन ३१ मार्च २०२५ च्या स्थितीवर बँकेस नफा प्राप्त झालेला असल्याचे ही ते यावेळी म्हणाले.बँकेकडे ११ संचालकांनी दिलेले लेखी मत व बँकेने लिहीलेले ठराव उपलब्ध आहे. संचालकांना जर असे वाटते की, बँकेने खोटे ठराव लिहीले आहे तर ते सक्षम न्यायालयासमोर का गेले नाही? यावरून ११ संचालकांचा खोटेपणा लक्षात येतो. सर्व ग्राहकांना, बँकेच्य ठेवीदारांना आम्ही आश्वासीत करतो व हमी देतो की, अशा अफवांवर विश्वास ठेवु नये बँकेचा कारभार हा पूर्णतः पारदर्शकपणे चालतो असल्याचे ते म्हणाले.सदर पत्रकार परिषदेला उपाध्यक्षअभिजित ढेपे,अजय मेहकरे,आनंद काळे उपस्थित होते.

# नागपुरात उभारला जाणार जगातील सर्वात मोठा सिनेमा स्क्रीन

## शहराच्या मनोरंजन क्षेत्रात होणार एक मोठा बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर:** नागपूर शहरात सिनेमा प्रेमींसाठी एक मोठी आनंदाची बातमी आहे. येत्या काही महिन्यांत, नागपूरमध्ये जगातील सर्वात मोठा सिनेमा स्क्रीन उभारला जाणार आहे. भारतातील मीडिया आणि एंटरटेनमेंट (एम अँड ई) क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (थ-तएड) च्या पहिल्या २०२५ आवृत्तीचा समारोप झाला, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर घोषणा केली की नागपुरात लवकरच जगातील सर्वात मोठा सिनेमा स्क्रीन उभारल्या जाणार आहे. त्यांनी हा भारतीय सिनेमासाठी एक महत्त्वाचा क्षण आणि महाराष्ट्रासाठी एक अभिमानास्पद पाऊल असल्याचे म्हटले.

स्क्रीनबद्दल तांत्रिक आणि लॉजिस्टिक तपशील जसे की त्याचा आकार, ठिकाण किंवा लाँच तारीख याविषयी अद्याप



औपचारिकपणे जाहीर केलेले नाहीत, त्यात अत्याधुनिक ऑडिओ-व्हिज्युअल तंत्रज्ञान असण्याची अपेक्षा आहे आणि ते जागतिक चित्रपट महोत्सव, मोठ्या स्वरूपातील स्क्रीनिंग इत्यादींसाठी ठिकाण म्हणून काम करू शकते. अभिषेक अग्रवाल जे 'कश्मीर फाइल्स' आणि 'वॅक्सिन वॉर' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहेत आणि विक्रम रेड्डी जे यूव्ही क्रिएशन्ससोबत जोडलेले आहेत. हे दोघे हा प्रोजेक्ट पुढे नेतील. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोघांचे आभार मानले. नागपूरमध्ये उभारला जाणारा जगातील सर्वात मोठा सिनेमा स्क्रीन हे शहराच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या प्रकल्पामुळे नागपूर शहराच्या मनोरंजन क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू होईल, ज्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय सिनेमा अनुभव मिळेल.

# जिल्हा परिषद शाळेतील 'कलादालन'चे उदघाटन

## 'कलादालन' विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ ठरणार– प्राचार्य देवेंद्र ठाकरे



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.६नांदगाव पेठ**
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड आहे, ती कला जोपासणे शाळेचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे कौशल्य असून ते कौशल्य पुढे आणण्याचे काम कलादालन करणार असून हे कलादालन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देणारे व्यासपीठ ठरणार असे प्रतिपादन प्राचार्य देवेंद्र ठाकरे यांनी शनिवारी कलादालन च्या उदघाटन प्रसंगी केले.विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्यातील सृजनशीलतेचा उजाळा देणाऱ्या 'कलादालन' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव पेठ येथे नुकताच उत्साहात पार पडला. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. वैशाली तायडे यांच्या हस्ते या कलादालनाचे उदघाटन करण्यात आले. या उपक्रमात पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध कचऱ्यातील साहित्याचा कल्पकतेने उपयोग करून सुंदर कलाकृती तयार केल्या. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांनी अडगळीत पडलेल्या वस्तूंना नवे जीवन देत त्या कलात्मकतेने साकारल्या. ही कृती केवळ सौंदर्यदृष्टीनेच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या चातुर्याचा, विचारशक्तीचा आणि सर्जनशीलतेचा उत्तम नमुना होती.यामध्ये मंडाला आर्ट, वारली चित्रकलेची देखील कला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे जोपासली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार मंगेश तायडे, दिनकर सुंदरकर, शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे, माजी प्राचार्य पवार सर,संतोष सातपुते यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. मान्यवरांनी कलादालनातील सर्व कलाकृतींची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे मनःपूर्वक कौतुक केले.

# राज्यात जलसंधारण महामंडळाकडून केली जाणारी कामे होणार रद्द; मुख्यमंत्र्यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई–** जल संधारणाच्या ज्या कामांना दोन-अडीच वर्षात प्रशासकीय मान्यता देण्यात आली, पण प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही, अशी कामे रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच बैठकीत दिले.

त्यामुळे या कामांत विशेष रस असलेले अधिकारी, लोकप्रतिनिधींचे धाबे दणाणले आहे. 'सह्याद्री'वरील या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंधारण मंत्री संजय राठोड, संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. त्यांच्यासमोरच मुख्यमंत्र्यांनी जलसंधारण महामंडळ हे केवळ बंधारे बांधणारे महामंडळ बनले आहे, दुसरी कामेच होत नाहीत, अशा कानपिचक्या दिल्या. प्रशासकीय मान्यता मिळाली पण कामे सुरू झालीच नाहीत ती रद्द करा, असे मुख्यमंत्री म्हणाले तेव्हा, ही कामे रद्द केली तर आमदार नाराज होतील, असे विभागातर्फे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

त्यावर, त्या नाराजीची



काळजी करू नका, मी त्याचे काय करायचे ते बघून घेईन, असे मुख्यमंत्र्यांनी खडसावले फारच आवश्यक एखादे काम असेल, तर त्याबाबत अपवादात्मक परिस्थिती म्हणून वेगळा निर्णय घेता येईल, असेही ते म्हणाले.काही कामे २०-२५ वर्षापासून रखडलेली आहेत याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. दोन वर्षात, विशेषतः निवडणूक वर्षात अनेक कामे हाती घेण्यात आली.

### 'त्या' अधिकाऱ्याचे कारनामे मुख्यमंत्र्यांपर्यंत?

– जलसंधारण महामंडळात अनेक वर्षे ठाण मांडलेल्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या कारनाम्याची माहिती 'सीएमओ' पर्यंत पोहोचली, असे सूत्रांनी सांगितले.

– या अधिकाऱ्याशिवाय खाते, मंत्र्यांचेही पान हलत नाही. मुख्यमंत्र्यांनी बैठकीत ज्या चुकीच्या गोष्टींवर बोट ठेवले त्यास हेच अधिकारी कारणीभूत असल्याचे म्हटले जात आहे.

– कुठे कोणती कामे घ्यायची याचा पंचवार्षिक आराखडा तयार करण्यासाठी वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन व जलसंधारणचे सचिव यांची समिती नेमा. तसेच कामांच्या माहितीसाठी डॅशबोर्ड तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.–

मान्यता मिळून सुरू झालेली अनेक कामे आहेत. त्यामुळे काही काळ नवीन कामे हाती घेऊ नयेत, अशी विनंती विभागाने केली. मुख्यमंत्र्यांनी ती मान्य केली.जलसंधारणामध्ये आमदारांना केवळ बंधारेच बांधून हवे असतात. कारण ते दिसणारे काम असते, दुसरे म्हणजे त्यात कंत्राटदारांना विशेष रस असतो. या पार्श्वभूमीवर बैठकीत फडणवीस यांनी बजावले की, ज्या कामांची गरज आहे तीच कामे झाली पाहिजेत.

# साहेब.. आम्ही शेणा-मातीच्या घरांत अजून किती दिवस राहायचं?

## राज्यातील ६१ हजार पात्र आदिवासी कुटुंबे पक्क्या घरांपासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती :** शबरी घरकूल योजनेच्या अंमलबजावणीतील प्रस्तावित निधी आणि प्रत्यक्ष वितरीत निधीतील तफावतीमुळे लाभार्थिंना फटका बसत आहे. त्यामुळे तीन वर्षात राज्याच्या विविध जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांपैकी ६१ हजार १८६ आदिवासी कुटुंबांना हक्काची घरे मिळाली नाहीत. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ मधून ही बाब समोर आली आहे.

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी व आदिवासी बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या पात्र लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत घराचे २६९.०० चौ.फूट चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे. २०२१-२२ ते २०२४-२५ या ३ वर्षे १० महिन्यांच्या



कालावधीत शासनाचे २ लाख ४१ हजार ६७० शबरी घरकुलांचे लक्ष्य होते. मात्र, त्यापैकी १ लाख ८० हजार ४८४ घरकुलेच मंजूर झाली. तब्बल ६१ हजार १८६ घरकुलांना मंजुरीच मिळालेली नाहीत. पक्की घरे नसल्याने कुडा-मातीच्या घरात आणखी किती दिवस काढावे, असा सवाल लाभार्थ्यांकडून विचारला जात आहे.

**घरकूल, शौचालयासाठी किती रुपये?**

घरकूल बांधण्यासाठी ग्रामीण भागाकरिता प्रति घरकूल अनुदान सर्वसाधारण क्षेत्रासाठी १ लाख २० हजार रुपये, नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी १ लाख ३० हजार रुपये (शौचालय बांधकामाव्यतिरिक्त) देण्यात येतात. शौचालय बांधकाम ासाठी १२ हजार रुपये अनुदान हे स्वच्छ भारत अभियानांतर्गत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत दिले जाते.

### २०२२-२३ मधील १०,००० प्रतीक्षेत

२०२२-२३ मध्ये शासनाचे ९३ हजार २८८ घरकुलांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, त्यापैकी फक्त ८२ हजार ५४५ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी तब्बल १० हजार ७४३ पात्र लाभार्थी आजही घरकुलांच्या प्रतीक्षेत आहेत.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे डेरा आंदोलन

## कर्जमाफी, पीकविमा व शेतमालाला हमीभाव देण्याची जोरदार मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती :** शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आज अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर डेरा आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी, रोजगार हमी योजनेचे मजूर सहभागी झाले होते. त्यांनी संपूर्ण कर्जमाफी, पीकविम्याची अंमलबजावणी, शेतमालाला योग्य हमीभाव, तसेच



रोजगार हमी योजनेत मजुरांचे थकित वेतन तात्काळ देण्यात यावे, अशा विविध मागण्या मांडल्या. आंदोलनाच्या दरम्यान सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विशेषतः निवडणुकी पूर्वी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची आठवण करून देत, त्याची तात्काळ पूर्तता करावी, अशी मागणी करण्यात आली. जर सरकारने लवकरात लवकर या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर पुढे अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.